# सेवक वार्ता

फेब्रुवारी-२०२५

वर्ष -६ अंक- ४

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## श्री. विठ्ठल पत्की जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

सेवक संघाची सर्व साधारण वार्षिक सभा दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता वनभवन पुणे संपन्न झाली. त्यात श्री. विठ्ठल पत्की यांचा, त्यांनी सेवक संघात केलेल्या दोन दशके सतत केलेल्या अविस्मरणीय स्वरुपाच्या प्रचंड व्यापक संघटनात्मक, व्यवस्थापकीय व विस्तारात्मक कार्याबद्दल शाल, श्रीफळ व विशेष गौरवचिन्ह श्री. मोहन खेडकर , सेवानिवृत्त प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे हस्ते गौरव करण्यात आला.



# सेवक संघ महाराष्ट्र ची सन २०२३-२४ ची साधारण वार्षिक सभा पुणे येथे संपन्न

सेवक संघाची सन २०२३-२४ ची सर्व साधारण वार्षिक सभा दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता वनभवन, पुणे संपन्न झाली. सदर सभेस अमरावती, धुळे, पुणे, नागपूर येथील संघाच्या शाखांचे पदाधिकारी व इतर सदस्यांची उपस्थिती होती. सभेचे अध्यक्षस्थानी श्री. विश्वास सावरकर होतम. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मोहन खेडकर लाभले होते.


































**वार्षिक सर्वसाधारण सभेस खालीलप्रमाणे सदस्यगण उपस्थित होते.**

विश्वास सावरकर, अध्यक्ष, सेवक संघ, मो. ह. खेडकर, अ. ना. बल्लाळ, व्ही टी पत्की, मदन कुलकर्णी, उमेश धोपेश्वरकर, प्रदीप कुलकर्णी, एस. के. गवळी, संजय

जगताप, व्ही ए धोकटे, राजेंद्र कदम, एस एच पाटील, आर के आडकर, प्रकाश क्षीरसागर, अरुण पुरोहित, सुभाष पुराणिक, विठ्ठल सूर्यवंशी, रामदास पुजारी, प्रकाश कुकडोलकर, सतीश गावंडे, त. गे. बिरदवडे, आर बी भवरे, आर एस आरगे ,बसवराज हिरेमठ, जी के निकम, बळवंत सेलूकर,एस. जी. खांडेकर, मिलिंद पंडितराव,बाळकृष्ण छल्लारे.

## ८ फेब्रुवारी २०२५ रोजी वनभवन, पुणे येथे झालेल्या सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र पुणे यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सेवानिवृत्त कर्मचारी संघाची (सेवक संघ) वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **८ फेब्रुवारी २०२५** वनभवन पुणे येथे आयोजित करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान श्री. विश्वास सावरकर, अध्यक्ष, सेवक संघ यांनी भूषविले. सभेस प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मो. ह. खेडकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र (सेवानिवृत्त) आणि श्री अ. ना. बल्लाळ प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त) उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीस सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात आली.

### १. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे वाचन व मंजुरी

श्री उमेश धोपेश्वरकर, कोषाध्यक्ष, सेवक संघ यांनी सन **२०२३-२४** च्या आर्थिक वर्षा**च्या** लेखा परीक्षण अहवालाचे वाचन केले. त्यास उपस्थित सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

### २. गतवर्षी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झालेली चर्चा व ठराव तसेच वर्षभरात झालेली कामे यांचा आढावा

२८ जानेवारी २०२४ रोजी धुळे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन श्री मदन कुलकर्णी, कार्यकारी अध्यक्ष यांनी केले आणि त्यातील तपशिलानुसार झालेल्या कामांची माहिती सभेत दिली. त्याचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे -

i) <u>प्रशिक्षणार्थींना सुवर्णपदक देणे -</u>

प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी यांना सेवक संघातर्फे सुवर्ण पदक देण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला होता.

चंद्रपूर व कुंडल येथील वनक्षेत्र प्रशिक्षण प्रबोधिनी मधील सर्वप्रथम येणाऱ्या वनक्षेत्रपालांना तो कोणत्याही राज्याचा असेल तरी व या प्रबोधिनी मध्ये महाराष्ट्राचे प्रशिक्षणार्थी असल्यास महाराष्ट्रीयन प्रशिक्षणार्थींना एक वेगळे सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक सेवक संघातर्फे देण्यात यावे.

<u>कार्यवाही</u> - यासंदर्भात अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण) यांना सप्टेंबर २०२४ मध्ये पत्राद्वारे माहिती देऊन परवानगी देण्यास विनंती करण्यात आली. त्यावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण) यांच्याकडून कळविण्यात आले की अशाप्रकारचे प्रस्ताव अन्य संस्था / यंत्रणांकडूनही आले असल्यामुळे याबाबत शासनाकडून मंजुरी घेणे आवश्यक आहे . त्यासाठी सेवक संघाने आवश्यक कार्यवाही करावी असे त्यांनी कळवले.याबाबत चर्चेअंती असे ठरविण्यात आले की सेवक संघातर्फे शासनास पत्र पाठवून मंजुरी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

**ii) सेवक वार्ता अंकांचे संकलन**

सेवक संघाच्या कामकाजाची माहिती दरमहा सेवक वार्तामधून देण्यात येते. मागील दोन वर्षाचे सेवक वार्ता अंकांचे संकलन करून १०० प्रती तयार कराव्यात आणि त्याचे वाटप देण्याचे ठरले.

<u>कार्यवाही</u> - याबाबत

- पुणे शाखेतर्फे कार्यवाही करण्यात यावी.संकलित सेवक वार्तांच्या प्रति शासकीय कार्यालयांबरोबरच प्रशिक्षण संस्था, वाचनालये, इतर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या संस्था यांनाही देण्यात याव्यात.

**iii) सेवक संघाच्या कामगिरीबाबत माहिती तयार करणे**

- सेवक संघाच्या सध्याच्या घडीपत्रिकेत अलीकडच्या काळातील कामांचाही समावेश करून सुधारित घडीपत्रिका तयार करण्यात यावी आणि त्याद्वारे कामांची माहिती विविध कार्यालयांना देण्यात यावी असे चर्चेअंती निश्चित करण्यात आले.

**iv) नागपूर येथील सेवक संघाच्या कार्यकारिणीचे बळकटीकरण**

नागपूर येथील कार्यकारिणीमध्ये अध्यक्षांसह अन्य पदाधिकाऱ्यांची नेमणूक झाली आहे आणि नवीन कार्यकारिणीने सेवक संघाच्या कामकाजात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे,

v) **तांत्रिक बाजू बळकट करणे**

वृक्ष गणनेसारख्या कामाबाबत नगर परिषदा, महानगरपालिका यांच्याकडून निविदा काढल्या जातात. त्यासाठी सेवक संघाने सॉफ्टवेअर तयार करून घेण्याबाबत एखाद्या तज्ञ व्यक्तीची नेमणूक त्यास मानधन देऊन करण्यात यावी आणि ज्या कामांमध्ये अशा तांत्रिक बाबींची आवश्यकता आहे अशी कामे मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. सेवक संघाच्या पुणे शाखेने याबाबत कार्यवाही करावी असे ठरविण्यात आले.

**vi)रोपवाटिकांचा मूल्यांकन कामाच्या रकमेचे वाटप**

वर्ष २०२३ मध्ये सेवक संघाने सामाजिक वनीकरण विभागाच्या ७७ रोपवाटिकांचे मूल्यांकन केले होते. त्याबाबतचा निधी अमरावती शाखेकडे प्राप्त झाला होता. रोपवाटिका मूल्यांकन कामासंदर्भात सदस्यांना मानधनाचे वाटप पूर्ण झाले असून उर्वरित रक्कम सेवक संघाच्या खात्यात जमा केले असल्याचे सांगितले.

### ३. दिवंगत सदस्यांना आदरांजली

मागील एक वर्षात दिवंगत झालेले सेवक संघाचे सदस्य आणि इतर वन अधिकारी यांची माहिती श्री पत्की

यांनी दिली. त्यानंतर या दिवंगत सदस्यांना दोन मिनिट स्तब्धता पळून आदरांजली वाहण्यात आली.

**४. कोलामार्काच्या नक्षलग्रस्त भागातील वन्यजीव छायाचित्रे व माहिती संकलित करून वन्यजीव संरक्षणासाठी हातभार लावत असलेले रोजंदारी कामगार श्री कपिल गुंडावार आणि श्री लक्ष्मण चौधरी यांचा सत्कार करणे**

कोलामार्का संवर्धन राखीव ( Conservation Reserve) चा व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची कार्यवाही सेवक संघातर्फे करण्यासाठी क्षेत्रीय काम करत असताना तेथे कार्यरत रोजंदारी कामगार श्री कपिल गुंडावार आणि श्री लक्ष्मण चौधरी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या या कामाची दखल घेत
या दोन्ही कामगारांचा सत्कार त्यांना प्रत्येकी रुपये १०००/- देऊन चंद्रपूर शाखेतर्फे करण्यात यावा.

**५. केंद्रीय कार्यकारिणीकडे जमा निधीचा विनियोग कोणत्या उपक्रमावर करण्यात यावा याबद्दल निर्णय घेणे.**

या विषयी सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली. सेवक संघाच्या बँकेतील खात्यात व मुदत ठेवीमध्ये पुरेसा निधी उपलब्ध आहे असे लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करताना दिसून आले. त्याचा विनियोग करण्याच्या दृष्टीने सभेमध्ये सदस्यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव मांडले. ( ज्यांनी प्रस्ताव मांडला त्यांचे नाव कंसामध्ये दिले आहे. )

i ) श्री मारुती चितमपल्ली, सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांना नुकतेच भारत सरकारने पद्मश्री देऊन गौरविले आहे. तरी त्यांचा सेवक संघातर्फे सत्कार करण्याचे ठरले. जागतिक वन दिवसाचे औचित्य साधून २१ मार्च २०२५ रोजी हा सत्कार करण्यात यावा.

ii) श्री चैत्राम पवार यांनी बारीपाडा , जिल्हा धुळे यांनी पर्यावरण संरक्षण, रानभाज्या लोकप्रिय करणे अशा ग्राम विकासाच्या बाबतीत मोलाचे काम केले आहे. त्यांना पद्मश्रीसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तरी सेवक संघातर्फेही त्यांना सन्मानित करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

iii)सेवक संघातर्फे यापूर्वी 'बारीपाडा रानभाज्या माहिती पुस्तिका' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले होते. नवीन माहिती आणि छायाचित्रांचा समावेश करून या पुस्तकाची सुधारित आवृत्ती सेवक संघातर्फे छापण्यात यावी हा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

iv) निसर्ग संवर्धन आणि पर्यावरणरक्षण याविषयी समाजात जागृती करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक सभागृहात चांगल्या दर्जाचे माहितीफलक लावणे, दरवर्षी निवडक १० - १२ शाळांना या विषयांसंबंधीचे पुस्तकांचे संच वाटप करण्यात यावेत, समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करावे हा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

v) नगर पालिका व नगर परिषदेच्या ताब्यातील उद्यानांमधील वृक्ष प्रजातीची ओळख पटविणे ( Identification) व दुर्मिळ प्रजातींची माहिती संकलित करणे ,जुनी, विशाल झाडे जतन करण्यासाठी संबंधितांना मार्गदर्शन करणे व सहकार्य करण्यात यावे हा सदर प्रस्ताव मान्य करण्यात आला.

vi) अमरावती जिल्ह्यात ग्रामीण भागात ३ ठिकाणी बस स्टॅन्डजवळ झाडे नसल्याने त्याच्या बाजूला वड, पिंपळ, कडुलिंब या प्रजातींची झाडे सेवक संघातर्फे लावण्यात आली असून ती झाडे आता सावली देऊ लागल्याने लोकांना त्याचा फायदा होऊ लागला आहे. अशाप्रकारची कामे यापुढेही करण्यात यावीत हा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

vii) वन विभाग अथवा अन्य विभाग/ संस्था यांच्या जागेवर वास्तु -पुरुष या संकल्पनेतून मानवाच्या विविध अवयवांच्या आरोग्यासाठी उपयुक्त औषधी वनस्पतींची लागवड योग्य नियोजन करून करावी. हा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. अशा कामासाठी जागा मिळणे कठीण असते आणि केलेल्या कामाची देखभाल काही कालावधीनंतर केली जात नाही असा अनुभव असल्याचे काही सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.

**६. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहणारे सहअध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांचा प्रवास खर्च सेवक संघाने करण्याबाबत निर्णय घेणे.**

सादर मागणी एकमताने मान्य करण्यात आली.

**७. सेवक संघाने वन विभागास काही सेवा विनामुल्य उपलब्ध करून सहकार्य करावे.... याबाबत चर्चा.**

कर्मचाऱ्यांना germination test, seed collection and gradation, root trainers, green net shed, poly-house इत्यादीच्या बाबत पुरेशी माहिती नसल्याचे सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिकांचे मूल्यांकन करताना आढळून आले. त्यामुळे अशा विषयांचे मार्गदर्शन सेवक संघाने विनामूल्य द्यावे असा प्रस्ताव त्यांनी मांडला. याबाबत वेगळ्याने प्रशिक्षणाचे आयोजन करण्याऐवजी मूल्यांकनाच्यावेळीच संबंधित कर्मचाऱ्यांना सेवक संघाच्या सदस्यांनी मार्गदर्शन करावे असे याबाबत ठरविण्यात आले.

**८. श्री जी. के. निकम आणि श्री बी. आर. छल्लारे, चाळीसगाव यांनी २०२४ च्या पंढरपूर वारीत वृक्ष लागवड, जल व मृद संधारण कामांबाबत जनजागृती केल्याबद्दल सत्कार करून बक्षीस देणे.**

पर्यावरण संवर्धनाबाबत श्री छल्लारे व श्री निकम करत असलेल्या व जनजागृतीबाबत केलेल्या कामाचे सर्वांनी कौतुक केले. त्यांच्या कामाची पावती म्हणून सेवक संघातर्फे या दोघांनाही प्रत्येकी रुपये दहा हजार रोख रक्कम, शाल आणि श्रीफळ देऊन सेवक संघाचे अध्यक्ष श्री विश्वास सावरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सभेचे कामकाज संपल्यानंतर श्री छिल्लारे यांनी कीर्तन सादर करून आपले कौशल्य दाखविले.

**९. सोलापूर - धाराशिव नवीन रेल्वे मार्गासाठी वन्यजीव संवर्धनार्थ Mitigation and Conservation Plan तयार करण्याच्या कामाचा आढावा.**

या कामाची पूर्तता झाली असून यासंदर्भात मोबदला संबंधित यंत्रणेकडून प्राप्त झाला आणि त्याचे वाटपही सदस्यांना करण्यात आल्याचे सांगितले.

**१०. नवीन कामे शोधण्याबाबत प्रस्ताव व चर्चा .**

याविषयी मुद्दा क्रमांक ५ मध्ये माहिती दिली आहे. त्याशिवाय याविषयी झालेल्या चर्चेत खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली. (१) सामाजिक वनीकरण विभागाच्या जाहिरातीस प्रतिसाद देऊन Expression of Interest सादर करण्यात आले आहे. (२) वनविभागाच्या वन्यजीव शाखेशी संपर्क साधून काही वनसंवर्धन राखीव क्षेत्रांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे काम चालू आहे.

(३) श्री संजय जगताप यांनी गेल्या वर्षभरात सेवक संघामार्फत करण्यात आलेल्या कामांची माहिती पुढील तपशिलानुसार दिली. (४) सामाजिक वनीकरण विभागाच्या ४८ रोपवाटिकांचे मूल्यांकन करण्यात आले. (५) चंद्रपूर जिल्ह्यातील ऑर्डनन्स फॅक्टरी परिसरातील वन्यप्राणी समस्येबाबत Mitigation Plan (उपशमन योजना) आराखडा तयार केला. (६) वेस्टर्न कोल फिल्ड साठी Mitigation Plan तयार केला. (७) अल्ट्राटेक सिमेंट क्षेत्रासाठी Mitigation Plan तयार करून सादर करण्यात आला आहे.

**११. सेवक संघाच्या खर्चाने गतवर्षात काही पुस्तके प्रकाशित करण्यात आली होती. त्याबाबत विक्रीची सद्यस्थिती काय आहे याचा लेखाजोखा**

i) श्री पत्की यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

श्री गिरी, सेवानिवृत्त वन अधिकारी यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या २०४० प्रति सेवक संघाने छापल्या आहेत. त्यापैकी ८०० प्रति शिल्लक आहेत. उर्वरित प्रतींपैकी ३० प्रतीचे वाटप चंद्रपूर वन प्रबोधिनी आणि व्याघ्र प्रकल्पास करण्यात आले आणि अन्य प्रतींची विक्री करण्यात आली आहे.

सेवक संघाने एफ. डी . सी. एम. लिमिटेड च्या स्मरणिकेचे ( १००० प्रति ) छपाईचे काम करून दिले असून त्याबाबतची पूर्ण रक्कम प्राप्त झाली आहे.

ii) श्री संजय जगताप यांनी त्यांच्या 'वनपराध - तपास व चौकशी' या पुस्तकाच्या बाबतीत संगितले की या पुस्तकाच्या पाच आवृत्यांपैकी पहिली आवृत्ती वगळता अन्य चार आवृत्ती सेवक संघातर्फे प्रकाशित करण्यात आल्या आहेत. पाचव्या आवृत्तीच्या २००० प्रति व्यतिरिक्त अन्य १०००० प्रतीची विक्री झाली आहे.

**१२. धुळे शाखेकडे पत्रव्यवहार, प्रमाणके, कॅश बुक असे बरेच जुने रेकॉर्ड संकलित झाले आहे व ते आता सांभाळण्यास आणि ठेवण्यास जागा नसल्याने अडचणीचे होत आहे. तरी असे सर्व रेकॉर्ड केंद्रीय समितीने ताब्यात घेऊन ठेवावे किंवा नष्ट करावे या प्रस्तावाबाबत विचार व्हावा.**

श्री गवळी यांनी धुळे शाखेतील सेवक संघाशी संबंधित रेकॉर्ड मोठ्या प्रमाणावर जमा झाल्याने ते ठेवण्यास जागा उपलब्ध नसल्याचे सांगितले. याप्रकरणी हे स्पष्ट करण्यात आले की केंद्रीय समितीच्या पुणे येथील वनभवन मधील कार्यालयात सेवक संघाच्या अन्य शाखांचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी जागा नाही. याविषयी झालेल्या चर्चेत जुन्या रेकॉर्डच्या विल्हेवाटीबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

- भविष्यात ज्याची आवश्यकता भासणार नाही असे १० वर्षापूर्वीचे रेकॉर्ड नष्ट करण्यात यावे.

- नष्ट करण्यात येणाऱ्या कागदपत्रांची नोंद एका नोंदवहीत घेण्यात यावी.

**१४. श्री पत्की यांचा सत्कार**

सेवक संघाचे समन्वयक श्री पत्की यांनी गेल्या अनेक वर्षात सेवक संघाच्या वाटचालीत सक्रिय सहभाग घेऊन मोलाची कामगिरी बजावली आहे. विविध यंत्रणांशी संपर्क ठेऊन सेवक संघासाठी कामे मिळविणे, त्या कामाचे नियोजन, अंमलबजावणीमध्ये मार्गदर्शन करणे, सर्व शाखांमध्ये समन्वय साधणे याबाबत श्री पत्की यांचे योगदान विचारात घेऊन त्यांचं या कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात यावा अशी विनंती सेवक संघाच्या अनेक शाखा व पदाधिकाऱ्यांनी केली होती. त्यानुषंगाने या सभेसाठी उपास्थित असलेले सेवक संघाचे ज्येष्ठ सदस्य श्री एम. एच. खेडकर यांच्याहस्ते श्री पत्की यांना सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

**१३. आयत्या वेळचे विषय**

**1. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा डेटा बेस तयार करणे**

सभेस उपस्थितप्रमुख पाहुणे श्री अ. ना. बल्लाळ यांनी सेवानिवृत्त वन कर्मचार्यांचेबाबतीत डेटा बेस तयार

करणे महत्वाचे आहे असे सांगितले. त्यामध्ये कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती, त्यांच्या मुलांचे शिक्षण याबाबतची माहिती संकलित करण्यात यावी अशी सूचना केली.

**2. श्री धोपेश्वरकर यांचा सत्कार**

सेवक संघाचे कोषाध्यक्ष श्री धोपेश्वरकर यांनी डिसेंबर २०२४ मध्ये सायकलद्वारे मेळघाट भ्रमण केले. त्यांच्या या धाडसी उपक्रमाचे कौतुक करून सेवक संघाच्या अमरावती शाखेने त्यांचा सत्कार केला.

**3. वर्ष २०२५ चे कॅलेंडर**

सेवक संघअमरावती शाखेकडून उपस्थितांना वर्ष २०२५ चे कॅलेंडर आकर्षक स्टँडसह भेट म्हणून देण्यात आले.

**अध्यक्षांचे मनोगत**

सेवक संघाचे अध्यक्ष श्री विश्वास सावरकर यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात मनोगत व्यक्त केले.

सभेच्या अंती श्री प्रदीप कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

**महाशिवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा**

सेवक संघ, महाराष्ट्र सन **२०२३-२४** चा आर्थिक वर्षा**च्या** लेखा परीक्षण अहवाल, जमा खर्च ताळेबंद,

SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH.
PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH.
B-8, SARASNAGAR SOCIETY, SHUKRAWAR PETH, PUNE - 411002.
REG. NO. F-13312.
F.Y.2023-24.

RECEIPT AND PAYMENT A/C.
FOR THE YEAR ENDED 31.03.2024.

| RECEIPT | AMOUNT | PAYMENTS | AMOUNT |
|---|---|---|---|
| TO OPENING BALANCE. | | BY PROGRAMME EXPENSES. | 25075.00 |
| BAL. WITH BANKS - | | BY PROFESSIONAL CHARGES | 10000.00 |
| CBI - AMRAVATI BR. A/C NO. 3598339472. | 210556.89 | BY ACCOUNT WRITING CHARGES | 12000.00 |
| BOM, DHULE BR. A/C NO. 60274744790. | 142893.00 | BY AUDIT FEES. | 10000.00 |
| JANLAXMI BANK, NASHIK A/C NO. 104371. | 51983.00 | BY FUEL CHARGES. | 6000.00 |
| JANTA SAHAKARI BANK, PUNE, A/C NO. 8772. | 503763.94 | BY MEETING CHARGES | 1250.00 |
| JANTA SAHAKARI BANK, PUNE, C/A | 1000.00 | BY POSTAGE CHARGES AND COURIER CHGS. | 3441.04 |
| HA GRAMIN BANK, A/C NO. 50502. | 13010.00 | BY BANK CHARGES | 1297.18 |
| | | BY EVALUATION CHARGES PAID | 1565500.00 |
| CASH IN HAND | 7625.50 | BY PRINTING AND STATIONERY CHARGES | 115836.05 |
| | | BY AGM EXPENSES | 34438.00 |
| TO TDS. | 113852.70 | BY TRAVELLING CHARGES | 387786.00 |
| TO BANK ACCOUNT CLOSED | 10681.00 | BY REFRESHMENT CHARGES. | 5394.00 |
| TO LOANS AND ADVANCES RECD. | 11890.00 | BY TRANSPORT CHARGES | 1080.00 |
| TO AMOUNT RECD. FROM DEBTORS | 3086473.00 | BY SUNDRY CHARGES | 490.00 |
| TO INTEREST ON SAVING BANK A/C | 27940.00 | BY PAYMENT TO CREDITORS | 339545.00 |
| TO EVALUATION CHARGES PAID RETURNED. | 26764.49 | BY GST PAID / TDS PAID. | 412294.91 |
| TO OTHER INCOME. | 25000.00 | BY ADVANCE PAID | 5000.00 |
| TO SALE OF BOOKS. | 65466.00 | BY TDS - A.Y. 2024-25 | 28890.00 |
| TO MEMBERSHIP FEES AND ENTRANCE FEES. | 17402.00 | BY TDS - GST | 28030.00 |
| TO LIFE MEMBERSHIP FEES RECD | 34330.00 | BY NEW FDR - PUNE | 400000.00 |
| | | BY CLOSING BALANCE. | |
| | | BAL. WITH BANKS - | |
| | | CBI - AMRAVATI BR. A/C NO. 3598339472 | 363517.35 |
| | | BOM, DHULE BR. A/C NO. 60274744790 | 49008.31 |
| | | JANLAXMI BANK, NASHIK A/C NO. 104371 | 55598.00 |
| | | JANTA SAHAKARI BANK, PUNE, A/C NO. 8772 | 471004.27 |
| | | JANTA SAHAKARI BANK, PUNE, C/A | 1000.00 |
| | | MAHA GRAMIN BANK, A/C NO. 50502 | 13010.00 |
| | | CASH IN HAND | 4146.41 |
| TOTAL RS. | 4350631.52 | TOTAL RS. | 4350631.52 |

S. S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS, Pune, Mem No. 190897

Sevanivrutt Vanakarmchari Sangh, Maharashtra

Chairman

Treasurer

Sevanivrutt Vanakarmchari Sangh, Maharashtra

SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH.

PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH.

B-8, SARASNAGAR SOCIETY, SHUKRAWAR PETH, PUNE - 411002.

REG. NO. F-13312.

F.Y.2023-24.

## RECEIPT AND PAYMENT A/C.
## FOR THE YEAR ENDED 31.03.2024.

| RECEIPT | AMOUNT | PAYMENTS | AMOUNT |
|---|---|---|---|
| **TO OPENING BALANCE.** | | BY PROGRAMME EXPENSES. | 25075.00 |
| BAL. WITH BANKS - | | BY PROFESSIONAL CHARGES | 10000.00 |
| CBI - AMRAVATI BR. A/C NO. 3598339472 | 210556.89 | BY ACCOUNT WRITING CHARGES. | 12000.00 |
| BOM, DHULE BR. A/C NO. 60274744790. | 142893.00 | BY AUDIT FEES. | 10000.00 |
| JANLAXMI BANK, NASHIK A/C NO. 104371 | 51983.00 | BY FUEL CHARGES. | 6000.00 |
| JANTA SAHAKARI BANK, PUNE, A/C NO. 8772 | 503763.94 | BY MEETING CHARGES | 1250.00 |
| JANTA SAHAKARI BANK, PUNE, C/A | 1000.00 | BY POSTAGE CHARGES AND COURIER CHGS | 3441.04 |
| MAHA GRAMIN BANK, A/C NO. 50502 | 13010.00 | BY BANK CHARGES | 1297.18 |
| | | BY EVALUATION CHARGES PAID | 1565500.00 |
| CASH IN HAND | 7625.50 | BY PRINTING AND STATIONERY CHARGES | 115836.05 |
| | | BY AGM EXPENSES | 34438.00 |
| TO TDS. | 113852.70 | BY TRAVELLING CHARGES | 387786.00 |
| TO BANK ACCOUNT CLOSED. | 10681.00 | BY REFRESHMENT CHARGES. | 5394.00 |
| TO LOANS AND ADVANCES RECD. | 11890.00 | BY TRANSPORT CHARGES | 1080.00 |
| TO AMOUNT RECD. FROM DEBTORS | 3086473.00 | BY SUNDRY CHARGES | 490.00 |
| TO INTEREST ON SAVING BANK A/C | 27940.00 | BY PAYMENT TO CREDITORS | 339545.00 |
| TO EVALUATION CHARGES PAID RETURNED. | 26764.49 | BY GST PAID / TDS PAID. | 412294.91 |
| TO OTHER INCOME. | 25000.00 | BY ADVANCE PAID | 5000.00 |
| TO SALE OF BOOKS. | 65466.00 | BY TDS - A.Y. 2024-25 | 28890.00 |
| TO MEMBERSHIP FEES AND ENTRANCE FEES | 17402.00 | BY TDS - GST. | 28030.00 |
| TO LIFE MEMBERSHIP FEES RECD | 34330.00 | BY NEW FDR - PUNE | 400000.00 |
| | | **BY CLOSING BALANCE.** | |
| | | BAL. WITH BANKS - | |
| | | CBI - AMRAVATI BR. A/C NO. 3598339472 | 363517.35 |
| | | BOM, DHULE BR. A/C NO. 60274744790 | 49008.31 |
| | | JANLAXMI BANK, NASHIK A/C NO. 104371 | 55598.00 |
| | | JANTA SAHAKARI BANK, PUNE, A/C NO. 8772 | 471004.27 |
| | | JANTA SAHAKARI BANK, PUNE, C/A | 1000.00 |
| | | MAHA GRAMIN BANK, A/C NO. 50502 | 13010.00 |
| | | CASH IN HAND | 4146.41 |
| **TOTAL RS.** | **4350631.52** | **TOTAL RS.** | **4350631.52** |

S.S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS Pune Mem No. 190897

Chairman

Treasurer

Sevanivrutt Vanakarmchari Sangh, Maharashtra

Sevanivrutt Vanakarmchari Sangh, Maharashtra

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT.1950
SCHDULE IX ( VIDE RULE 17 (1) )
SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH.
PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH.
B-8, SARASNAGAR SOCIETY, SHUKRAWAR PETH, PUNE - 411002.
REG. NO. F-13312.

F.Y. 2023-24.
ANNEXURE B - EXPENSES ON THE OBJECTS OF THE TRUST.

| SR. NO. | PARTICULARS | AMOUNT (RS) |
|---|---|---|
| 1 | EVALUATION CHARGES PAID. | 1551000.00 |
| 2 | PRINTING AND STATIONERY CHARGES. | 145611.05 |
| 3 | AGM EXPENSES | 87940.00 |
| 4 | TRAVELLING CHARGES. | 375786.00 |
| 5 | PRINTING OF BOOKS. | 170000.00 |
| 6 | REFRESHMENT CHARGES. | 5394.00 |
| 7 | TRANSPORT CHARGES. | 1080.00 |
| | TOTAL RS. | 2336811.05 |

S. S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS Pune Mem No. 190897

Chairman Treasurer
Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT.1950
SCHDULE IX ( VIDE RULE 17 (1) )
SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH.
PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH.
B-8, SARASNAGAR SOCIETY, SHUKRAWAR PETH, PUNE - 411002.
REG. NO. F-13312.

F.Y. 2023-24.
ANNEXURE A - ESTABLISHMENT EXPENSES.

| SR. NO. | PARTICULARS | AMOUNT (RS) |
|---|---|---|
| 1 | PROGRAMME EXPENSES. | 51283.00 |
| 2 | PROFESSIONAL CHARGES. | 10000.00 |
| 3 | ACCOUNT WRITING CHARGES. | 15000.00 |
| 4 | DOMAIN AND HOSTING OF WEBSITE CHGS. | 26911.00 |
| 5 | SOFTWARE AND COMPUTER SERVICES. | 30000.00 |
| 6 | FUEL CHARGES. | 6000.00 |
| 7 | MEETING CHARGES. | 1250.00 |
| 8 | POSTAGE CHARGES AND COURIES CHGS. | 3441.04 |
| 9 | SUNDRY EXPENSES. | 552.00 |
| 10 | BANK CHARGES | 1503.69 |
| 11 | INTEREST ON LATE PAYMENT OF TDS | 229.00 |
| 12 | BAD DEBTS. | 68816.00 |
| | TOTAL RS. | 214985.73 |

S. S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS Pune Mem No. 190897

Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

Chairman Treasurer
Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT.1950

SCHDULE IX ( VIDE RULE 17 (1) )

SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH.

PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH.

B-8, SARASNAGAR SOCIETY, SHUKRAWAR PETH, PUNE - 411002.

REG. NO. F-13312.

# BALANCE SHEET

## AS ON 31st MARCH, 2024.

| FUNDS & LIABILITIES | RS. | RS. |
|---|---|---|
| **TRUSTS FUNDS OF CORPUS** | | |
| Balance as per last Balance sheet | 15311.00 | |
| Adjustments during the year (give details) | 0.00 | 15311.00 |
| **OTHER EARMARKED FUNDS.** | | |
| (Created under the provision of the trust deed or scheme or out of the Income). | | |
| Depreciation Fund | | |
| Sinking fund | | |
| Reserved Fund | | |
| Any Others | | |
| Life Membership Fees | 126350.00 | |
| Add : Additions | 34330.00 | 160680.00 |
| **LOANS (Secured or Unsecured.)** | | |
| From Trustees | 3000.00 | |
| From Others | 0.00 | 3000.00 |
| **PROVISIONS.** | | |
| For expenses | 40000.00 | |
| For advances | 0.00 | |
| For rent & other deposits | 0.00 | |
| For sundry credit balance | 0.00 | 40000.00 |
| **DUTIES AND TAXES.** | | 315279.97 |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT.** | | |
| Balance as per last Balance Sheet. | 2727844.26 | |
| Less : Appropriation, if any | 159645.00 | |
| Add : Surplus as per Income & Exp A/c. | 619375.10 | |
| Less : Deficit as per Income & Exp.A/c. | 0 | 3187574.36 |
| TOTAL RS. | | 3721845.33 |

| PROPERTY & ASSETS. | RS. | RS. |
|---|---|---|
| **IMMOVABLE PROPERTIES (at cost)** | | |
| (suitably classified giving mode of valuation | 0.00 | |
| Additions or deductions (including those for depreciation if any.during the year | 0.00 | 0.00 |
| **INVESTMENT** | | |
| Gold & Silver Ornaments. | 0.00 | |
| Note : The market value of the investment is Rs. | | 0.00 |
| **FURNITURE & FIXTURE.** | | |
| Balance as per last Balance sheet | 12136.32 | |
| Addition during the year. | 0.00 | |
| Less : Sales during the year. | 0.00 | |
| Depreciation up to date. | 1213.32 | 10[illegible].00 |
| **COMPUTER.** | | |
| Balance as per last Balance sheet | 36163.00 | |
| Addition during the year | 0.00 | |
| Less : Sales during the year. | 0.00 | |
| Depreciation up to date. | 14465.00 | 21698.00 |
| **PRINTER.** | | |
| Balance as per last Balance sheet | 6051.00 | |
| Addition during the year. | 0.00 | |
| Less : Sales during the year | 0.00 | |
| Depreciation up to date | 2420.00 | 3631.00 |
| **LOANS (Secured or Unsecured)** | | |
| **Good / Doubtful.** | | |
| Loans Scholarships. | | |
| Other Loans. | | |
| **ADVANCES** | | |
| To Trustees | | 6849.00 |
| To Employees | | [illegible].00 |
| To Contractors. | | 0.00 |
| To Lawyers. | | 0.00 |
| To Others (T.D.S. - A.Y. 2023-24). | | 37865.00 |
| **DEBTORS.** | | 574674.00 |
| **CASH AND BANK BALANCE** | | |
| (a) Bank Balances | | 953137.93 |
| (b) Fixed Deposit Account | | 2108921.00 |
| (c) With the Trustees. | | 4146.41 |
| (d) With the Manager | | |
| TOTAL RS. | | 3721845.33 |

PLACE : PUNE. AS PER OUR REPORT OF EVEN DATE

DATE : 18.10.2024 FOR S. S. SAHASRABUDHE & CO.

CHARTERED ACCOUNTANTS.

SUYASH S. SAHASRABUDHE.

PROPRIETOR.

UDIN : 24190897BKFTGV7811

S. S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS FRN - 160809W 301, Bhelke Capital, Bhelke Chowk, Near Yashwantrao Chavan Natyagruha, Kothrud, Pune - 411 038. Mem. No. - 190897

S. S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS Pune Mem No. 190897

The Above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and Assets of Trusts.

DATE : 18.10.2024 FOR SEVANIVRUTTA VANKARMACHARI SANGH.

PRESIDENT SECRETARY TREASURER.

Sevanivrutt Vanakarmchari Sangh, Maharashtra

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT.1950

SCHDULE IX ( VIDE RULE 17 (1) )

SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH.

PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH.

B-8, SARASNAGAR SOCIETY, SHUKRAWAR PETH, PUNE - 411002.

REG. NO. F-13312.

## INCOME AND EXPENDITURE ACCOUNT.

## FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2024.

| EXPENDITURE. | RS. | RS. | INCOME. | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| TO EXP. IN RESPECT OF PROPERTIES | | | BY MEMBERSHIP FEES. | | 17290.00 |
| TO ESTABLISHMENT EXPENSES (Annex A) | | 214985.73 | BY INCOME FROM ACTIVITY OF TRUST. | | |
| | | | a Sale of Books | 277466.00 | |
| TO REMUNERATION TO TRUSTEES. | | | b Evaluation Charges Recd | 1926500.00 | |
| | | | c Syllabus Revision Fees | 820800.00 | |
| | | | c Other Income | 25195.20 | 3049961.20 |
| TO REMUNERATION (in the case of a math ) to the head of the math. incl. his houshold expenditure,If any. | | | BY INTEREST (accrued / realised). On Securities On Loans On Bank Accounts | | |
| | | | Fixed Deposits | 104079.00 | |
| TO LEGAL EXP. | | | Saving Bank | 27940.00 | |
| TO AUDIT FEES. | | 10000.00 | Others | 0.00 | 132019.00 |
| TO CONTRIBUTION & FEES. | | | BY DIVIDEND. | | |
| TO AMOUNT WRITTEN OFF. (a) Bad debts (b) Loan scholership (c) Irrecoverable rents (d) Other items | | | BY SUBSCRIPTION RECD. BY DONATION IN CASH OR KIND. BY GRANTS. | | |
| TO MISCELLANEOUS EXP. | | | BY INCOME FROM OTHER SOURCES (in details as far as possible) | | |
| TO DEPRECIATION. | | 18098.32 | BY TRANSFER FROM RESERVE. | | |
| TO AMOUNT TRASFERRED TO - - RESERVE OR SPECIFIC FUNDS. | | | BY Deficit carried over to Balance sheet. | | |
| TO EXP. ON OBJECTS OF THE TRUST. (a) Religious (b) Educational (c) Medical Relief (d) Relief of Poverty | | | | | |
| (d) Other charitable objects (Annex - B) | 2336811.05 | 2336811.05 | | | |
| TO Surplus carried over to Balance Sheet. | | 619375.10 | | | |
| TOTAL RS. | | 3199270.20 | TOTAL RS. | | 3199270.20 |

PLACE : PUNE. AS PER OUR REPORT OF EVEN DATE

DATE : 18.10.2024 FOR S. S. SAHASRABUDHE & CO.
CHARTERED ACCOUNTANTS.

S. S. SAHASRABUDHE & CO. Pune Mem No. 190897 CHARTERED ACCOUNTANTS

SUYASH S. SAHASRABUDHE.
PROPRIETOR.
UDIN : 24190897BKFTGV7811.

S. S. SAHASRABUDHE & CO.
CHARTERED ACCOUNTANTS
FRN - 130309W
301, Bhelke Capital, Bhelke Chowk,
Near Yashwantrao Chavan Natyagruha,
Kothrud, Pune - 411 038.
Mem. No. - 190897

The Above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and Assets of Trusts.

DATE : 18.10.2024 FOR SEVANIVRUTTA VANKARMACHARI SANGH.

PRESIDENT SECRETARY TREASURER.

Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

**The Bombay Public Trust Act,1950.**
**SCHEDULE -IX C**
**(Vide Rule 32)**

Statements of income liable to contribution for the year ending **31st March, 2024.**

Name of Public Trust **SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH, PUNE (PUNE,DHULE AND AMRAVATI BRANCH).**

Registered No **F-13312.**

| | Rs P | Rs P |
|---|---|---|
| **I. Income as show in the Income and Expenditure Account (Schedule IX)** | | 3199270 20 |
| **II. Items not chargeable to Contribution under section 58 and Rule 32 :** | | |
| (i) Donations received from other Public Trusts and Dharmadas | | |
| (ii) Grants received from Government and Local authorities | | |
| (iii) Interest on Sinking or Depreciation Fund | | |
| (iv) Amount spent for the purpose of secular education | | |
| (v) Amount spent for the purpose of medical relief | | |
| (vi) Amount spent for the purpose of veterinary treatment of animals | | |
| (vii) Expenditure incurred from donations for relief distress caused by scarcity, drought, flood, fire, or other natural calamity | NIL | |
| (viii) Deduction out of income from lands used for agricultural purposes :- (a) Land Revenue and Local Fund Cess (b) Rent payable to superior landlord (c) Cost of production , if lande are cultivated by trust | | |
| (ix) Deduction out of income from lands used for non-agricultural purposes :- (a) Assessment, cesses and other Goverment or Municipal Taxes | | |
| (b) Ground rent payable to superior landlord | | |
| (c) Insurance premia | | |
| (d) Repairs at 10 per cent of gross rent of buildings | | |
| (e) Cost of collection at 4 per cent of gross rent of buildings let out | | |
| (x) Cost of collection of income or receipts from securities stocks Etc. at 1 per cent of such income | 1040 79 | |
| (xi) Deduction on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income , at 10 per cent of the estimated gross annual rent | NIL | |
| | | 1040 79 |
| **Gross Annual Income chargeable to contribution Rs.** | | **3198229.41** |

Certified that while claiming deductions admissible under the above Schedule, the Trust has not climed any amounts twice, either wholly or partly, against any of the items mentioned in the Scehdule which have the effect of double- deduction

Trust Address

Dated 18 10 2024

Chartered Accountants, Auditor
UDIN 24190897BKF[illegible]

Dated 18 10 2024

Trustee

S. S. SAHASRABUDHE & CO.
CHARTERED ACCOUNTANTS
FRN - 160309W
301, Bhelke Capital, Bhelke Chowk,
Near Yashwantrao Chavan Natyagruha,
Kothrud, Pune - 411 038.
Mem. No. - 190897

Chairman
Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

Treasurer

Sevanivrutt Vanakarmchari Sangh,
Maharashtra

**Report of an auditor relating to accounts audited under sub-section (2) of section 33 & 34 and rule 19of the Bombay Public Trusts Act.**

Registration No **F-13312.**

Name of the Public Trust **SEVANIVRUTTA VAN KARMACHARI SANGH (PUNE, DHULE AND AMRAVATI BRANCH).**

For the year ending **31ST MARCH, 2024.**

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether accounts are maintained regularly and in accourdance with the provisions of the Act and the rules | YES |
| (b) | Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts | YES |
| (c) | Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement in voucher with the accounts . | CASH IS NOT PHYSICALLY VERIFIED BY US |
| (d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or recordes required by the auditor were produced before him . | YES |
| (e) | Whether a register of movable and immovable properties is properly maintained the changes therein are communicated from time to time the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with . | YES |
| (f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him . | YES |
| (g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust . | NO |
| (h) | The amount of outstandings for more than one year and the amount written off, if any . | NIL |
| (i) | Whether tenders were invisted for repairs or construction involving expenditure exceeding Rs 5,000/ . | N-A |
| (j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35 | NO |
| (k) | Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor . | N-A |
| (l) | All cases of irregular,illegal or improper expenditure, or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other property therof, and whether such expenditure, failure, omission,loss or waste was caused in consequence of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trusted or any other person while in the management of the trust . | NO |
| (m) | Whether the budget has been filed in the from provided by rule 16A . | YES |
| (n) | Whether the maximum and minimum number of the trustees is maintained . | YES |
| (o) | Whether the meetings are held regularly as provided in such instrumented . | YES |
| (p) | Whether the minute books of the proceeding of the meeting is maintained . | YES |
| (q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust . | NO |
| (r) | Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust . | NO |
| (s) | Whether the irregularities pointed out by the auditors in the accounts of the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit . | N-A |
| (t) | Any special matter which the auditors may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner | NO |

Dated at 18 10 2024

S. S. SAHASRABUDHE & CO. CHARTERED ACCOUNTANTS Pune Mem No. 190897

Chartered Accountants
Auditors
UDIN: 24190897BKFTGV7817

S. S. SAHASRABUDHE & CO.
CHARTERED ACCOUNTANTS
FRN - 160809W
301, Bhelke Capital, Bhelke Chowk,
Near Yashwantrao Chavan Natyagruha,
Kothrud, Pune - 411 038.
Mem. No. - 190897


## अभिनंदनाचे मानकरी

सेवक संघाचे धुळे शाखेने ज्यांचेसोबत काम करून वन संवर्धन कामाच्या वाटचालीत चार वर्षांपूर्वी रान भाज्यावर २००० पुस्तिका प्रकाशित केली व संबंध प्रस्थापित केले, ते समाज सेवक व निसर्गमित्र श्री. चैत्राम पवार यांना भारत सरकारने त्यांची ग्रामीण विकास, निसर्ग संवर्धन व इतर लोकोपयोगी कामाचा गौरव करून "पद्मश्री" प्रदान केली आहे. त्यांचे सेवक संघ महाराष्ट्र परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन .






श्री. चैत्राम पवार यांना महाराष्ट्र राज्य सरकारने गेल्या वर्षी "वन भूषण" पुरस्कार देवून गौरविले आहे. वन भूषण पुरस्कार जाहीर झाल्यानंतर या पुरस्काराचे ते सर्वात पहि ले मानकरी ठरले आहेत.




सोलापूरचे सुपुत्र, प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षिशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक, अवघे जीवन वनविद्येचा अभ्यास आणि लेखनासाठी समर्पित करणारे व्यासंगी संशोधक व वनाधिकारी म्हणून मारुती चितमपल्ली यांची ओळख मराठी जगताला आहे.

अरण्यऋषी अशी ओळख असणाऱ्या सोलापूरच्या या सुपुत्रास श्री.मारूती चित्तमपली यांना भारत सरकारने त्यांची साहित्य सेवा, निसर्ग सेवा आणि वन सेवा गौरवार्थ "पद्मश्री" बहाल केली आहे. १२ नोव्हेंबर १९३२ साली जन्मलेल्या श्री. चित्तमपल्ली यांना वयाचे ९२ व्या वर्षी हा बहुमान मिळाला ही आनंदाची व अभिमानाची बाब आहे. सरळ सेवा भरती वनक्षेत्रपाल पदावरील वन अधिका-यास पद्मश्री प्रदान करण्याचा बहुतेक हा पहिलाच प्रसंग असावा. याचा सार्थ अभिमान वाटतो. त्यांचे सेवक संघाचे वतीने मनःपूर्वक अभिनंदन.

सेवक संघाचे मध्यवर्ती कार्यकारिणीने त्यांचा सत्कार,सोलापूर येथे त्यांचे निवासस्थानी जाऊन आणि त्यांना रु.११,१११/- शाल,श्रीफळ व प्रमाणपत्र प्रदान केले जाणारआहे.

## परमवैभवाच्या वाटेवरील बारीपाडा...

(महेश काळे)

सामाजिक कार्यकर्ते श्री चैतरामजी पवार यांना अत्यंत प्रतिष्ठेचा पद्मश्री पुरस्कार आज- २६ जानेवारीस घोषित झाला. अत्यंत चिकाटीने, परिश्रमपूर्वक आणि मुख्य म्हणजे गावातील सर्व लहान थोर मंडळींना सोबत घेत चैत्राम पवार यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ३०-३२ वर्षांमध्ये बारीपाडा येथे जे परिवर्तन झाले ते खरोखरच कुठल्याही प्रतिष्ठेच्या पुरस्काराला साजेसे असेच आहे. एका अर्थाने सामूहिक कार्य करणाऱ्या बारीपाड्यातील प्रत्येक नागरिकाचा हा सन्मान आहे.

तीस वर्षांपूर्वी सर्वसामान्य वनवासी गावासारख्याच सामान्य असणाऱ्या जिल्ह्यातील साक्री तालुक्यात असलेल्या या छोट्याशा गावाने आपल्या स्वत:मध्ये जे एक अभूतपूर्व परिवर्तन घडवले आहे, ते थक्क करणारे आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील बारीपाड्याच्या या प्रयोगाची दखल घेतली गेली आहे. एकूणच वनवासी समाजाच्या नशिबाला आलेले वर्षानुवर्षांचे दैन्य-दु:ख, हालअपेष्टा, उपेक्षा पचवून या गावाने एक इतिहास घडवला आहे. ज्याची दखल प्रशासकीय स्तरावर तर घेतली गेलीच, पण जगाला देखील आपल्या स्वबळावर घडवलेल्या विकासाची कथा ऐकण्यास बारीपाड्याने भाग पाडले आहे.

खरं तर आपले घर, गाव आणि समाज याच्या विकासाची कल्पना प्रत्येकाच्या मनात कळत-नकळत रेंगाळत असतेच. पण बहुतेकांच्या ती मनातच राहाते.

चैतराम पवार हे मात्र त्याला अपवाद ठरले. आयुष्याच्या एका निश्चित वळणावर कल्याण आश्रमाचा संपर्क आला आणि करिअर, पैसा प्रतिष्ठा या गोष्टी गौण ठरल्या. अनेक समस्यांनी ग्रस्त असणाऱ्या आपल्या गावाच्या परिवर्तनाचे एक चित्र त्यांच्या मनात निर्माण झाले. मुख्य म्हणजे आपल्या मनात निर्माण झालेले विकासाचे चित्र आपल्या सहकाऱ्यांच्या, ग्रामस्थांच्या मनात निर्माण करण्यातही त्यांनी यश प्राप्त केले. गावातील महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी दररोज चार-पाच मैल होणारी पायपीट...डिसेंबर महिना सरला की तळ स्वच्छपणे दिसणाऱ्या गावातील तीन चार विहिरी...जवळपास दवाखाना नसल्याने पाचवीलाच पुजलेले आजारपण ... पोटापुरती होणारी पावसाळी शेती नंतर गावात काम नसल्याने मोठ्या प्रमाणात होणारे स्थलांतर...१०० घरांच्या गावात अवघ्या दहा-बारा एकरमध्ये दुबार पीकं घेता येतील अशी स्थिती. अत्यंत अपुरं असं जंगल ज्यावर बांधकामासाठी लाकूड तर दूरच पण जाळण्यासाठी देखील फाट्या पुरेशा उपलब्ध होत नव्हत्या... पण बारीपाड्याच्या ग्रामस्थांनी प्रबळ इच्छाशक्ती दाखवल्याने मार्ग निघत गेला, अनेक कार्यकर्ते, संस्था आणि मुख्य म्हणजे शासकीय अधिकारी देखील मदतीला आले. वर्षातील अकरा महिने या जंगलचे रक्षण करायचे व एक महिना आपल्याला आवश्यक तेवढेच लाकूड तोडायचे असा नियम करण्यात आला. नवीन लागवड करण्यापेक्षा जंगलात उगवणाऱ्या झाडांचेच रक्षण करण्यावर भर देण्यात आला.

अवघ्या तीन-चार वर्षातच प्रचंड जंगल या परिसरात तयार झाले. अनेक दुर्मिळ वनस्पतींचे जतन या भागात होऊ लागले. मोहाची तर एवढी मुबलक झाडे या परिसरात आली की त्याच्या फुलांच्या लिलावातून गावाला मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध झाला. या मोहाच्या पेंडीपासून बारीपाड्यात वीज तयार करण्याचा प्रयोग देखील करण्यात आला. गावात पिण्याच्या पाण्याची प्रचंड टंचाई भासत होती. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून अल्पावधीतच ३५० छोटे, मोठे दगडी बंधारे बांधण्यात आले.या सर्व प्रयत्नांमुळे गावच्या परिसरातील पाण्याच्या पातळीत एकदम वाढ झाली. विहिरींना मुबलक प्रमाणात पाणी आले. आज तर स्थिती अशी आहे की काही वर्षापूर्वी पाण्यासाठी वणवण फिरणारे बारीपाडा जवळपासच्या चार गावांच्या पिण्याच्या पाण्याची निकड भागवत असल्याचे सुखद चित्र पाहण्यास मिळत आहे. पावसाळ्यात जेमतेम पोटापुरते धान्य पिकवणारे ग्रामस्थ या वाढलेल्या पाण्याच्या बळावर आता कांदा, ऊस , तांदुळ, गहू यासारखी पिके घेऊन आपल्या आर्थिक उत्पन्नात भर घालताना दिसत आहेत. आले, स्ट्रॉबेरी,बटाटा, सोयाबीन यासारख्या पिकांची लागवड आता या परिसरात मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. चारसूत्री भातशेतीचा आधार घेऊन भाताचे उत्पन्न जवळपास तिप्पट वाढवून घेण्यात बारीपाड्यातील अनेक शेतकऱ्यांनी यश प्राप्त केले आहे. बासमती तांदुळ, रसायनविरहित गुळ, पापड उद्योग, दोरखंड तयार करणे, शेळीपालन, ससापालन, कोबडीपालन, मधमाश्या पालन, असे अनेक यासारखे अनेक प्रयोग ग्रामस्थांनी यशस्वीपणे राबवले आहेत.

बारीपाड्यात आता जंगल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. या जंगलात अनेक पौष्टिक व पारंपारिक भाज्या उपलब्ध आहेत. त्यांची माहिती सर्वांना व्हावी यासाठी गेल्या काही वर्षापासून बारीपाड्यात महिलांसाठी वन भाजीपाला स्पर्धा आयोजित केल्या जातात. दरवर्षी महिला अत्यंत उत्साहाने त्यात सहभागी होतात. आतापर्यत ७०भाज्या व या भाज्या बनविण्याचे ४३२ प्रकार यातून समोर आले आहेत. गेल्या सात-आठ वर्षापासून या जंगलात घडणाऱ्या बदलाची सविस्तर नोंद करण्यासाठी एक रजिस्टर ठेवण्यात आले आहे. सध्या संपूर्ण देशात सर्वशिक्षा
अभियान मोठ्या उत्साहात चालू आहे. पंधरा वर्षांपूर्वी विद्यार्थी व शिक्षकाविना ओस पडलेल्या बारीपाड्यातील
शाळेने हे अभियान केव्हाच यशस्वी केले आहे. शाळेत अनुपस्थित असलेल्या शिक्षकाला व विद्यार्थ्याच्या पालकाला गावाने दंड आकारल्यानंतर वाढलेला शाळेचा किलबिलाट आजपर्यंत चालू आहे. त्यातून प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण शंभर टक्क्यांपर्यत केव्हाच पोहोचले आहे.

गेल्या वीस वर्षांमध्ये विकासाचे अनेक टप्पे बारीपाड्याने पार केले आहेत. जंगल, जमीन आणि जल असा क्रम, सामूहिक निर्णय आणि पारदर्शक व्यवहार या त्रिसूत्रीच्या आधारावर बारीपाड्याने ग्रामविकासाचा मोठ्या टप्पा पार केला आहे. या तीस वर्षांत गावाने आपल्या हक्काचे ४४५ हेक्टर घनदाट जंगल निर्माण केले असून ३५० चेकडॅमस् आणि १३ तळ्यांच्या बळावर हे गाव आता ५ गावांना पाणी पुरवठा करत आहे. वनवासी भागात अभावानेच आढळणारी पिकांच्या बाबतीतील विविधता आता इथे दिसत आहे. अवघ्या ४ विहिरी असणाऱ्या गावांत मुबलक पाणी असणाऱ्या विहिरींची संख्या ४० झाली आहे. गावांतील सर्व कुटुंब दारिद्र्यरेषेच्या वर आली असून कर्जमुक्त गाव म्हणून बारीपाडा उदयास आले आहे.

स्वावलंबी व समृद्ध गाव म्हणजे काय याचे उत्तर प्रत्यक्ष बारीपाड्यात गेल्यावरच आपल्याला मिळते. 'परमवैभव' ही कल्पना बारीपाड्याच्या ग्रामस्थांनी आपल्या पुरूषार्थाच्या बळावर मूर्त स्वरूपात आणली आहे. परमवैभवाचा महत्वपूर्ण टप्पा पार करून बारीपाडा आता आणखी शेकडो गावांना वैभवाच्या या वाटेवरून येण्यासाठी प्रेरणा देण्यास आता सिद्ध झाला आहे.

या गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी गेल्या ३५ वर्षांपासून अथक प्रयत्न करणारे श्री चैत्राम जी पवार यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करून निरलसपणे कार्य करणारा कोंदणातील आणखी एका हिरा व त्यांनी केलेले अफाट कार्य पुरस्काराच्या निमित्ताने जगासमोर आले आहे. सामाजिक क्षेत्रात काहीतरी परिवर्तन घडवू इच्छिणाऱ्या सर्वांनाच चैतरामजींचे कार्य प्रेरणा देणारे असेच आहे.

कुठल्याही चांगल्या गोष्टीचा प्रारंभ हा एकत्र येण्यातून होतो. गावांत स्पर्धा भरविण्याच्या निमित्ताने एकत्र आलेल्या या तरूणांमध्ये आत्मविश्वासासोबतच ग्रामविकासाचे स्फूल्लिंग चेतविण्यात त्या परिसरात कल्याण आश्रमाचे कार्य करणारे डॉ.आनंद फाटक यशस्वी झाले. त्यातून या सर्व तरूणांचे नियमित एकत्रिकरण, चर्चा संवाद, सहली, कार्यकर्त्यांसोबत गप्पा असे अनेक कार्यक्रम सुरू झाले. खेळाच्या माध्यमातून सुरू झालेले हे एकत्रीकरण आणि खेळ, खेळांमध्ये भारताची असलेली बिकट अवस्था इथून सुरू झालेली ही चर्चा आपला वनवासी समाज, या समाजाचा असलेला गौरवशाली इतिहास... काळाच्या ओघात या समाजापुढे निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची मालिका, वनवासी समाजाचे आजचे चित्र, हे चित्र बदलण्यासाठीचे उपाय असे अनेक वळणे घेत काही महिन्यांनंतर एका निश्चित वळणावर येउन थांबली.या साऱ्या चर्चेचे सार एकच होते... ते म्हणजे.. स्वावलंबी व समृद्धशाली गावाची निर्मिती !

सुरूवात कुठून ? अर्थात आपल्याच गावातून म्हणजे बारीपाड्यातून !!

आपल्या या गावाला विकासाच्या एका निश्चित मार्गावर नेउन ठेवण्याचं दायित्व आलं ते अर्थातच चैतराम पवारांवर.

सर्वप्रथम बारीपाड्याने वन व्यवस्थापनाचा एक अभिनव प्रयोग राबवला. गावाच्या परिसरात असलेल्या जंगलाचे गावकऱ्यांनीच रक्षण करायचे. त्यासाठी गावाला एकत्र येऊन कुऱ्हाडबंदी व चराई बंदीचा धाडसी निर्णय घ्यावा लागला. गावाने आपल्या खर्चाने एक वॉचमन ठेवला. कुऱ्हाडबंदीचा हुकूम जो मोडेल त्याला १०५१ रूपयांचा दंड करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला. लाकडे तोडताना पकडून देणाऱ्यासही विशेष बक्षिस ठेवण्यात आले होते. गावातील लोक एकत्र येऊन जंगल रक्षणाचे आपलेच कार्य करत असल्याचे लक्षात येताच फॉरेस्ट खात्यानेही मदतीचा हात पुढे केला. वन व्यवस्थापनाचा एक अभूतपूर्व प्रयोग बारीपाडा परिसरात राबवण्यात आला.

**आज एक सामयिक प्रसंग**--- बातें गांव देहात की और उनके पालतू गौवंश की।

हल खींचते समय यदि कोई बैल गोबर या मूत्र करने की स्थिति में होता था तो किसान कुछ देर के लिए हल चलाना बन्द करके बैल के मल-मूत्र त्यागने तक खड़ा रहता था ताकि बैल आराम से यह नित्यकर्म कर सके, यह आम चलन था । हमने (ईश्वर वैदिक) यह सारी बातें बचपन में स्वयं अपनी आंखों से देखी हुई हैं । जीवों के प्रति यह गहरी संवेदना उन महान पुरखों में जन्मजात होती थी जिन्हें आजकल हम अशिक्षित कहते हैं । यह सब अभी 30-40 वर्ष पूर्व तक होता रहा।

उस जमाने का देसी घी यदि आजकल के हिसाब से मूल्य लगाएं तो इतना शुद्ध होता था कि 2 हजार रुपये किलो तक बिक सकता है । उस देसी घी को किसान विशेष कार्य के दिनों में हर दो दिन बाद आधा-आधा किलो घी अपने बैलों को पिलाता था।

टिटिहरी नामक पक्षी अपने अंडे खुले खेत की मिट्टी पर देती है और उनको सेती है । हल चलाते समय यदि सामने कहीं कोई टिटिहरी चिल्लाती मिलती थी तो किसान इशारा समझ जाता था और उस अंडे वाली जगह को बिना हल जोते खाली छोड़ देता था । उस जमाने में आधुनिक शिक्षा नहीं थी । सब आस्तिक थे । दोपहर को किसान जब आराम करने का समय होता तो सबसे पहले बैलों को पानी पिलाकर चारा डालता और फिर खुद भोजन करता था। यह एक सामान्य नियम था।

बैल जब बूढ़ा हो जाता था तो उसे कसाइयों को बेचना शर्मनाक सामाजिक अपराध की श्रेणी में आता था । बूढा बैल कई सालों तक खाली बैठा चारा खाता रहता था, मरने तक उसकी सेवा होती थी। उस जमाने के तथाकथित अशिक्षित किसान का मानवीय तर्क था कि इतने सालों तक इसकी माँ का दूध पिया और इसकी कमाई खाई है ,अब बुढापे में इसे कैसे छोड़ दें , कैसे कसाइयों को दे दें काट खाने के लिए ???

जब बैल मर जाता तो किसान फफक-फफक कर रोता था और उन भरी दुपहरियों को याद करता था जब उसका यह वफादार मित्र हर कष्ट में उसके साथ होता था । माता-पिता को रोता देख किसान के बच्चे भी अपने बुड्ढे बैल की मौत पर रोने लगते थे।पूरे जीवन काल तक बैल अपने स्वामी किसान की मूक भाषा को समझता था कि वह क्या कहना चाह रहा है ।

वह पुराना भारत इतना शिक्षित और धनाढ्य था कि अपने जीवन व्यवहार में ही जीवन रस खोज लेता था। वह हजारों वर्ष पुरानी संस्कृति वाला वैभवशाली भारत था , वह अतुल्य भारत था । पिछले 30-40 वर्ष में लार्ड मैकाले की शिक्षा उस गौरवशाली सुसम्पन्न भारत को निगल गई । आधुनिकता सबसे पहले देश की संवेदनाओं को जहर का टीका लगाती है फिर शर्म-हया की जड़ों में तेजाब डालती हैऔर फिर मानवता को पूरी तरह अपंग बनाकर उसे अपनी जरूरत की मशीन का रूप दे देती है।

उन्नतिशील कृषि विधा को अपनाकर बढ़ती जनसंख्या की उदरपूर्ति का लक्ष्य तो हमने शायद पूरा कर लिया है लेकिन... अपने मौलिक जीवन की बलि भी चढ़ा दिया है । "उन गोवंशो को" निराश्रित आवारा बनाकर छुट्टा सड़कों पर छोड़कर फसलों और यातायात के मार्ग में एक

विकट समस्या उत्पन्न कर दिया है, जो... कभी हमारे ग्रामीण जीवन के आधार थे।

## धरण क्षेत्रातील गाळ उपसा अभियान !

अनुवादक : मनोहर अ . सैंदाणे
वि. व. अ. सेनि पुणे

प्रस्तावना

कधी मिळणार मुबलक पिण्याचे पाणी ! या करीता धरणात पाणी पूर्ण साठवणे अत्यावश्यक आहे. जिल्ह्यातील खडकवासला, टेमघर , पानशेत, परसगाव ही धरणे कोरडी पडली आहेत. पाणी धरणात साठले तरच पाणी मिळणार. धरणात गाळ साचल्याने बहुतेक पाणी वाहून जाते. या करीता खडकवासला धरणातील गाळ उपसा अभियान बाबत महिती देण्यात येत आहे.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी १८७९ साली खडकवासला धरण बांधले त्या वेळी त्याची क्षमता होती ४टी एम् सी आणि पुण्याची लोकसंख्या होती चार लाख, आणि आता धरणाची क्षमता १.७५ अणि लोकसंख्या पन्नास लाख. पण जेव्हा धरण बांधले त्याला १३५ वर्षे झालीत. तेव्हापासून ते आजपर्यंत धरण ६०% गाळाने भरते आहे. मग तहान कशी भागणार. फक्त खडकवासलाच नाही तर महाराष्ट्रातील सर्वच धरणाची हीच अवस्था आहे. भिषण पाणी संकट ओढवले आहे. आजपर्यंत पावसालाच दोष देण्यात येत होता. पाउस पडतो तेवढाच पडतो. त्याला साठवून ठेवणे आपले काम आहे. पडलेला पाऊस धरणात साठतच नाही. जवळपास सगळीच धरणे गाळाने भरली आहेत. यावर एकच उपाय की धरणातील गाळ काढणे व धरणाचे पुर्नज्जीवन करणे.

पुण्यात हे काम कधीच सुरु झाले आहे. हे काम पुण्यातील "ग्रीन थंब" नावाची संस्था करीत आहे. निधडया छातीने संरक्षण दलातील काम करून निवृत्त झालेल्या सैनिकानी संस्था स्थापन केली आहे. ते हे काम करीत आह. कर्नल सुरेश पाटील, कर्नल लक्ष्मण साठे, कमांडर रविद्र पाठक , कर्नल एस. के. सिंग, कर्नल अजित देशपांडे, श्री अनिल पाटील यांनी सदर काम करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले अभियान सुरु केले आहे. त्यांना श्रीमंत दगडूशेट हलवाई, पुणे शहर व जिल्ह्यातील गणेश मंडळाचा पाठींबा मिळाला आहे. यासाठी अमूल्य योगदान खडकवासला धरण ( पाटबंधारे वि.), पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालीका, सदर्न कमांड पुणे, महसूल विभाग, सामाजिक वनीकरण, आर. टी. ओ यांचे कडून प्राप्त झाले आहे. आणि इतर खाजगी कंपनीज, क्लब आणि पुणेकर नागरीकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. ग्रीन थब ने आतापर्यंत सात लाख टन गाळ धरणक्षेत्रात काढला आहे. धरणाच्या दोन्ही बाजूने ४४ किमी अंतराच्या बाजूने क्षेत्रातील हा गाळ काढावयाचा आहे. हो गाळ पुन्हा वाहून येऊ नये म्हणून उपाय योजना म्हणून वृक्षारोपण (५० लाख रोपे लावून) करण्यात येणार आहे. त्यामुळे हा परिसर पर्यटन स्थळ म्हणून आपोआप विकसीत होईल. एवढा मोठा काढलेला गाळ म्हणजे काळे सोने ( खत) आजूबाजूचे परीसरातील शेतकरी हा गाळ फुकट नेऊन ५०% शेतीचे उत्पन्न वाढवत आहे.

धरणे जगली तर आपण जगू, यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. राज्यातील धरणे जगली तर राज्य सुजलाम सुफलाम होण्यास मदत होऊ शकते. याची सुरवात पुण्यातील खडकवासला धरणातून झाली आहे. या कामी " ग्रीन थंब " च्या पाणी चळवळ व अभियान ने केली आहे. त्यामुळे शहरे जगतील, कारखान्यान।, बाधकामांन। पिण्यासाठी, शेतीसाठी, इ. साठी पाणी मिळेल. पाणी मिळाल्याने अन्न मिळेल.

चला करू या, जल क्रांती !
शेतीमध्ये होईल, हरीत क्रांती !!
देशामध्ये होईल, आर्थिक क्रांती !!!

## वाचक प्रतिक्रिया

### सेवक वार्ता, जानेवारी-२०२५

* सेवक वार्ता, जानेवारी 2025, खरोखरच सुबक व सुंदर, अभिनंदन, गवळीसाहेब. –एन. ए. पाटील

* जाहीर केले प्रमाणे वेळेवर म्हणजे 25 जानेवारीला सर्व सोपस्कर करून सेवक वार्ता अंकाचे प्रकाशन केल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.श्री पत्की सर व श्री पंडितराव यांचे अनुभव छान आहेत.मंगलाबाईचा साळवण ते दाजीपूर प्रवास रोमहर्षक आहे.मी 67 ते 71 गगनबावडा येथे होतो.त्यावेळेस तळकोकण भाग हा गगनगड वनक्षेत्रमधे समावेश होता.अणि वैभववाडी अणि साळवण हे राऊंड होते.विविध विषयांचा समावेश केल्याने अंक वाचनीय आहे.सातत्याबद्दल श्री गवळी साहेबांचे अभिनंदन

- विठ्ठल भावे

* मनःपूर्वक अभिनंदन, श्री गवळी साहेब व सहकारी. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अंक प्रकाशन. श्री. पत्की सर, श्री. पंडितराव साहेब यांचे अनुभव, श्री जगताप साहेब व श्री. पुजारी साहेब यांच्या पुस्तकात बाबत माहिती उत्तम. मांडणी व सातत्य बद्दल पुन्हा एकदा अभिनंदन 👍 - विठ्ठल धोकटे


केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६